
वर्ष : ०५ | अंक: १० | मुंबई, मंगळवार २९ जानेवारी २०१९ ते ४ फेब्रुवारी २०१९ | पृष्ठ: ४
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
मूल्य २/- रुपये
POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021
Website: www.policebatmipatra.com
www.policebatmipatra.in

# पोलीस बातमी पत्र

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 वीजदर युनिटमागे ५० ते ६० पैशांनी वाढणार
3 → श्वास गुदमरतोय!
मराठा आरक्षणाचा पूर्ण अहवाल द्या: हायकोर्ट ← 4

## महाराष्ट्रात शिवसेनाच मोठा भाऊ
# दिल्लीचे तख्त हलविणार!



*मुंबई - शिवसेनेच्या खासदारांची बहुचर्चित बैठक सोमवारी मुंबईत झाली. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी खासदारांना मार्गदर्शन केलं. खासदार संजय राऊत यांनी बैठकीची माहिती पत्रकारांना दिली. शिवसेनेच्या या बैठकीनंतरही युतीबाबत शिवसेनेने संदिग्ध भूमिकाच दिसून आली. महाराष्ट्रात शिवसेनाच मोठ्या भावाच्या भूमिकेत आहे आणि यापुढेही राहिल असं संजय राऊत यांनी वारंवार सांगत शिवसेनेची भूमिका अजुनही नरमलेली नसल्याचेच संकेत दिलेत.*




जवळ आलेल्या लोकसभेच्या निवडणुका आणि भाजपकडून वारंवार दिला जाणारा युतीचा प्रस्ताव यामुळे शिवसेनेच्या या बैठकीकडे सगळ्यांचं लक्ष लागलं होतं. गेल्या काही दिवसांपासून भाजपकडून युतीबाबत चर्चा सुरू असल्याची माहितीही दिली जात होती. मात्र भाजपकडून युतीचा कुठलाही प्रस्ताव आला नसल्याचं राऊत यांनी स्पष्ट केलं. शिवसेना दिल्लीचं तख्त हलवेल असंही त्यांनी सांगितलं.

भाजपने युतीचा प्रस्ताव दिला अशी माहिती कोण देते माहित नाही, शिवसेना आपल्या भूमिकेवर कायम आहे असंही ते म्हणाले. सरकारने ८ लाख वार्षिक उत्पन्न असलेल्या खुल्या गटातील वर्गाला १० टक्के आरक्षण दिलं आहे. ८ लाख उत्पन्न असलेला गरीब असेल तर आयकराची मर्यादाही ८ लाखांपर्यंत वाढविण्यात यावी अशी मागणीही त्यांनी केली.

या बैठकीत राज्यातल्या दुष्काळावर चर्चा झाली असून शिवसेना दुष्काळ निवारणाच्या कार्यात सक्रिय राहणार असल्याचं त्यांनी सांगितलं. युतीबाबत राऊतांना वारंवार प्रश्न विचरण्यात आला होता. त्या प्रत्तेक प्रश्नावर त्यांचं उत्तर ठरलेलं होतं. महाराष्ट्रात शिवसेनाच मोठा भाऊ आहे असं त्यांनी वारंवार सांगितलं. त्यामुळे शिवसेना युतीबाबत भाजपवर आपला दबाव कायम ठेवणार असल्याचे संकेतच शिवसेनेने दिले आहेत.




## 'हेलप्पींग हॅन्ड' या कर्करोग विरोधी काळजी घेणाऱ्या प्रकल्पाच्या अनुषंगाने मिरा-भाईंदरमध्ये 'आश्रय ट्रस्ट' तर्फे शिबिर घेण्यात आले





दिनांक २८ जानेवारी रोजी मिरा-भाईंदर रोड वर जूना गोल्डन नेस्ट येथील वेडींग हब या शोरूम समोर आश्रय ट्रस्टच्या संस्थापक सचिव सौ. प्रिती दिपक नाईक यांच्या जन्मदिवसाच्या निमित्ताने महीलांसाठी कर्करोग विरोधी काळजी घेणाऱ्या प्रकल्पाच्या अनुषंगाने हेलपींग हॅन्ड या अधुनिक तंत्रसाधनाच्या सहाय्याने मेमोग्राफी स्क्रिनिंग (मोफत तपासणी शिबिर) आयोजित केले. या शिबिरामध्ये

उर्वरित पृष्ठ 4 वर




'लोकसत्त वर्षवेध'चे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मंगळवारी झाले. यावेळी (डावीकडून) टी.जे.एस.बी. सहकारी बँक लिमिटेडचे सुनील साठे, वास्तुरविराजचे डॉ. रविराज अहिरराव, एम.के. घारे ज्वेलर्सचे उदय घारे, ओ.एन.जी.सी.चे एस. गोपीनाथ, फडणवीस, तन्वी हर्बल्सचे डॉ. पुष्कराज धामणकर, केसरी टूर्सचे प्रमोद दळवी, यू.बी. ग्लॅमरसच्या डॉ. प्रज्ञा बापट, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशनचे एस.एस. सुदरराजन, गोविंद मिल्स अँड मिल्क प्रॉडक्ट प्रा.लि.चे राजकुमार शर्मा उपस्थित होते.

*तन्वी हर्बल्स प्रस्तुत या उपक्रमाचे सहप्रायोजक श्रीधूतपापेश्वर, रिजन्सी ग्रुप आहेत. 'टीजेएसबी' बँक ही बँकिंग पार्टनर, यू.बी. ग्लॅमरस हे बेलनेस पार्टनर असून हा उपक्रम एम.के.घारे ज्वेलर्स, केसरी टूर्स, गोविंद दूध, वास्तुरविराज, ओएनजीसी, बीपीसीएल आणि एमएडीसीद्वारे पॉवर्ड बाय आहे.*

## पाणी नाही, मात्र निवडणुकीच्या तोंडावर सार्वजनिक एसी टॉयलेट



**सोलापूर :** निवडणुका जवळ आल्यानंतर लोकांची मनं अपल्या बाजूला वळवण्यासाठी लोकप्रतिनीधी काय करतील याचा काही नेम नाही. सोलापुरातल्या भाजपच्या चार नगरसेवकांनी महापालिकेच्या निधीचा उपयोग करून सार्वजनिक एसी टॉयलेट्सची (शौचालयांची) उभारणी केली आहे. सोलापुरातल्या या पहिल्याच सार्वजनिक एसी टॉयलेटचे आज उद्घाटन होणार आहे.सोलापुरातल्या चादरी आणि साड्यांच्या बाजाराजवळ गर्दीच्या ठिकाणी एसी टॉयलेट्सची उभारणी केली आहे. या भागात टॉयलेट उभारणे गरजेचे हेते. चौदा लाख रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या या टॉयलेटमध्ये चार नगरसेवकांनी मिळून चार एसी बसवले आहेत. महिलांच्या शौचालयात दोन, चेंजिंग रूममध्ये एक आणि पुरुषांच्या शौचालयात एक असे चार एसी बसवण्यात आले आहेत.सोलापूर हा दुष्काळी जिल्हा आहे. ज्या सोलापुरात पिण्यासाठी पाणी नाही. लोकांकडे साधं शौचालय नाही. लोक उघड्यावर शौचास जातात. अशा सोलापुरात हा एसी टॉयलेटचा फार्स कशाला? असा सवाल लोकांनी उपस्थित केला आहे.

## ५१ प्रावशांच्या मृत्यूला कारणीभूत ठरली एक सिगरेट



### विमान दुर्घटनेचा अहवाल १० महिन्यांनंतर सादर

बांगलादेशमधील ढाक्याहून नेपाळला जाणारे विमान मागील वर्षी मार्च महिन्यात कोसळले. ५१ जणांना प्राण गमावावा लागलेल्या या अपघातासंदर्भातील चौकशीचा अहवाल रविवारी कंपनी सादर केला. अहवालानुसार वैमानिक कॉकपीटमध्ये धुम्रपान करत असल्याने हा अपघात झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. विमानाच्या कॉकपीटमध्ये धुम्रपान करण्यास परवाणगी नसतानाही वैमानिकाने नियमांचे उल्लंघन केल्याचे या अहवालात म्हटले आहे.

मूळची अमेरिकन कंपनी असणाऱ्या विमान कंपनीने या संदर्भातील एक अहवाल जारी केला आहे. कंपनीच्या नियमांनुसार घरगुती तसेच परदेशी उड्डाणांदरम्यान विमानात धुम्रपान करण्यास बंदी आहे. मात्र या अपघातग्रस्त विमानाचा वैमानिक धुम्रपान करत होता. कॉकपीट व्हॉइस रेकॉर्डरमधील डेटामधील माहितीमुळे वैमानिक धुम्रपान करत असल्याचे सिद्ध होत आहे. मात्र वैमानिक धुम्रपान करत असल्याचे ऑप्रेशन विभाग तसेच नियंत्रण कक्षातील कोणाच्याही लक्षात आले नाही असं या अहवालामध्ये तपास समितीने म्हटले आहे.

## उसगांव डोंगरी येथे श्रमजीवी सघटनेचे संस्थापक विविके पंडीत यांच्या उपस्थितीत एक दिवसीय प्रशिक्षण शिबिर संपन्न

श्रमजीवी संघटनाही गरीब आणि होतकरु नागरिकांसाठी कार्य करते. यामध्ये गरीबांना न्याय मिळवून देणे , उपजिवीकेसाठी काम देणे , त्यांचे विविध प्रश्न सोडवणे असे अनेक प्रकारचे कार्य या संघटनेद्वारे संस्थापक विवेक पंडीत यांच्यावतीने करण्यात येतात. यातीलच एक भाग म्हणजे यावर्षी श्रमजीवी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचे एकदिवसीय प्रशिक्षण शिबीर दिनांक १३.०१.२०१९ रोजी उसगाव डोंगरी येथे घेण्यात आले. या शिबीराची सुरुवात दिप प्रज्वलनाने तसेच शाहीर दत्ताराम म्हात्रे यांच्या वतीने सानेगुरुजींच्या "खरा तो एकची धर्म." या प्रार्थनेने झाली. शाहीर दत्ताराम म्हात्रे व रामभाऊ वारल्या यांच्या पहाडी आवाजाने अनेक पोवाडे व स्वातंत्र्याची आठवण करुन देणारे अंगावर शहारे आणणारे असे "आता उठवू सारे रान." अशाप्रकारची अनेक गीते सादर केली. यावेळी समाजसेवक श्रमजीवी संघटना संस्थापक विवेक पंडीत यांनी स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही आपण मागे का ? आपण ही श्रवजीवी संघटनेमार्फत देशाला हातभार लावू व आपल्या देशाला उन्नतीसाठी प्रयत्न करु अशाप्रकारचे विषय मांडून पदाधिकाऱ्यांना महत्व पटवून दिले. यावेळी शिबिराचे प्रमुख सुरेश रेंजल , राज्याचे सरचिटणीस बाळाराम भोईर , विजय जाधव यांनी उपस्थिती लावली व रात्री १०.०० वाजता शिबीराची सांगता झाली.



# वीजदर युनिटमागे ५० ते ६० पैशांनी वाढणार

**मुंबई - वीजदरवाढीमुळे हैराण झालेल्या वीजग्राहकांवर आता नव्या पर्यावरण नियमांचा भार पडणार असून पर्यावरण रक्षणासाठी औष्णिक वीजनिर्मिती प्रकल्पांना नव्या यंत्रणा बसवाव्या लागणार आहेत. प्रकल्पातून बाहेर पडणाऱ्या राखेच्या वाहतुकीचा बोजाही पडणार असल्याने प्रति युनिट ५० ते ६० पैशांची वीजदरवाढ होणार आहे.**



केंद्रीय पर्यावरण विभागाने कोळशावर आधारित वीजनिर्मिती प्रकल्पांसाठी पर्यावरण रक्षणाचे नवीन नियम लागू केले आहेत. केंद्र सरकारच्या, राज्य सरकारच्या व खासगी अशा सर्व प्रकारच्या औष्णिक वीजनिर्मिती प्रकल्पांना या नियमांची अंमलबजावणी बंधनकारक करण्यात आली आहे. त्यामुळे आता राष्ट्रीय औष्णिक वीज महामंडळ, महानिर्मिती, अदानी यांसारख्या सर्व वीजनिर्मिती कंपन्यांनी त्यासाठी होणारा खर्च मिळावा, या मागणीसाठी केंद्रीय वीज नियामक आयोग आणि राज्य वीज नियामक आयोगात धाव घेतली आहे.

औष्णिक वीजनिर्मिती प्रकल्पात वीजनिर्मितीसाठी कोळसा जाळल्यावर त्यातून राखेचे कण, सल्फर-नायट्रोजन ऑक्साइड यासारखे आरोग्यासाठी घातक वायूही बाहेर पडतात. राखेचे कण चिमणीतून बाहेर पडण्याआधीच शक्य तितक्या प्रमाणात शोषून घेण्यासाठी इलेक्ट्रोस्टॅटिक प्रॉसिपिटेटर (ईएसपी) यंत्रणा बसवावी लागणार आहे. तर सल्फर नियंत्रणासाठी 'फ्लू गॅस डिसल्फरायझेशन' (एफजीडी) नावाची यंत्रणा बसवावी लागेल, असे नियम बंधनकारक करण्यात आले आहेत. त्यामुळे पाणी गार करणारे मनोरे प्रकल्पस्थळी उभारावे लागतील. या तिन्ही यंत्रणांपोटी वीजप्रकल्पाच्या क्षमतेनुसार प्रति मेगावॉट ५० ते ८० लाख रुपयांचा खर्च वाढणार आहे. त्यामुळे विजेच्या स्थिर दरांत २५ ते ३५ पैशांनी वाढ होईल. तर या तिन्ही यंत्रणा कार्यान्वित ठेवण्यासाठी प्रकल्पांतर्गत विजेचा वापर वाढेल आणि विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या विजेत थोडी कपात होईल. त्याचा फटका आठ ते १० पैसे प्रति युनिट बसेल.

# मुंबई पोलीस दलात आता 'बेल्जियन शेफर्ड'

**मुंबई** - हुंगण्याच्या तीव्र शक्तीबरोबरच धावण्यातही चपळ असलेल्या 'बेल्जियन शेफर्ड' जातीच्या श्वानांचा समावेश होणार आहे. भारतीय लष्कर आणि राष्ट्रीय सुरक्षा बल (एनएसजी) या यंत्रणांमध्ये तपासकामांकरिता 'बेल्जियन शेफर्ड'ची मदत घेतली जाते. त्याच धर्तीवर मुंबई पोलीस दलात १० बेल्जियन शेफर्ड दाखल केले जाणार आहेत.

मुंबई पोलीस दलाच्या तीन शाखांकडे २५ प्रशिक्षित श्वान आहेत. यापैकी लॅबरेडोर प्रजातीचे नऊ श्वान बॉम्बशोधक व नाशक पथकाकडे आहेत, तर श्वान पथक आणि गुन्हे शाखेकडे लॅबरेडोर आणि डॉबरमन या दोन्ही प्रजातींचे श्वान आहेत. आतापर्यंत मुंबईच्या कानाकोपऱ्यात स्फोटके, अमली पदार्थ शोधण्याची जबाबदारी



शांत स्वभावाच्या, आज्ञाधारक लॅबरेडोरकडे होती, तर चपळ, काटक आणि तितकेच आक्रमक डॉबरमन गंभीर गुन्ह्यानंतर आरोपींचा माग काढत होते. मात्र ही दोन्ही महत्त्वाची कामे बेल्जियन शेफर्ड एकहाती करू शकतो, असा दावा पोलीस करतात. पोलीस दलाने १० बेल्जियन शेफर्ड ताफ्यात घेण्याचे ठरवले. त्यापैकी पाच श्वान दोन आठवड्यांपूर्वी दाखल झाले. नऊ महिन्यांचे प्रशिक्षण घेण्यासाठी ते येत्या काही दिवसांत रवाना होतील. प्रशिक्षण पूर्ण करून आल्यानंतर यातील तीन श्वान बॉम्बशोधक-नाशक पथकाकडे आणि एक गुन्हे शाखेच्या सेवेत रुजू होईल.

जर्मन शेफर्ड, लॅबरेडॉर, डॉबरमनच्या तुलनेत बेल्जियन शेफर्ड अनेकपटीने उजवा ठरतो. मुंबईतील दमट वातावरणाशी तो व्यवस्थित जुळवून घेऊ शकतो. तसेच त्याच्या आरोग्याबाबतच्या तक्रारीही कमी आहेत, अशी माहिती पुण्यातील डॉग ब्रीडर सचिन रावते यांनी दिली.

# मी कुत्र्या-मांजरांवरती बोलत नसतो

## *प्रकाश आंबेडकरांची आठवलेंवर जहरी टीका*

**मुंबई** - भारिप बहुजन महासंघाचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केंद्रीयमंत्री रामदास आठवले यांच्यावर जहरी टीका केली आहे. आंबेडकर हे औवेसींसोबत जातात पण रिपबल्कीन पक्षातील नेत्यांशी बोलत नाहीत, असे आठवलेंनी म्हटले होते. त्यासंदर्भात त्यांना प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर बोलताना, मी कुत्र्या-मांजरांवरती बोलत नसतो, असे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटलं.

प्रकाश आंबेडकर यांनी आगामी लोकसभा निवडणुकांसदर्भात बोलताना रामदास आठवलेंना अतिशय तुच्छ समजले आहे. विषेश म्हणजे आठवलेंची तुलना करताना चक्क कुत्र्या-मांजरांशी बोलत नसल्याचे ते म्हणाले. आम्ही कुणाच्याही मागे जात नाही, आमची आणि एमआयएम पक्षाची युती लोकसभा निवडणुकीनंतरी कायम



राहणार असल्याचं आंबेडकर यांनी स्पष्टपणे सांगितलं. तसेच लोकसभेसाठी सोलापुरातून की अकोल्यातून याबाबत सांगताना त्यांनी येणारी वेळ ठरवेल असं म्हटलंय. मात्र, आगामी निवडणुकीत आम्ही आरएसएसला एक नंबरचा शत्रू समजत असल्याचं ते म्हणाले. हे बोलत असतानाच त्यांनी रामदास आठवलेंसंदर्भातील प्रश्नावर उत्तर देताना, मी कुत्र्या-मांजरांवरती बोलत नसल्याचे म्हटले. आंबेडकरांच्या या वक्तव्यामुळे प्रकाश आंबेडकर आणि रामदास आठवले यांच्यातील मतभेद टोकाचे असल्याचे उघड होत आहे.

# कार्यकर्त्यांना रोखा अन्यथा कारवाई!

## *बेकायदा फलकबाजीप्रकरणी न्यायालयाचा राजकीय नेत्यांना इशारा*

**मुंबई** - बेकायदा फलकांवर वारंवार झळकणाऱ्या राजकीय नेत्यांनीच आता पुढाकार घेऊन बेकायदा फलकबाजी करणाऱ्या कार्यकर्त्यांना रोखले नाही, तर काही महिन्यांनी येणाऱ्या निर्णायक वेळेस हे नेते महत्त्वाच्या कामांसाठी उपलब्ध होणार नाहीत, असा सूचक इशारा उच्च न्यायालयाने शुक्रवारी सगळ्याच राजकीय पक्षांच्या नेत्यांना दिला.

आपल्या या वाक्याचा नेमका अर्थ काय आहे हे तुम्हाला कळलेच असेल, असेही न्यायालयाने निवडणुकांचा आणि अवमान कारवाईचा बडगा उगारला जाण्याचा उल्लेख न करता स्पष्ट केले.

बेकायदा फलकबाजी करणार नाही, अशी हमी देऊनही ती करणाऱ्या कार्यकर्त्यांवर काय कारवाई केली याबाबत भाजपने एकदाही प्रतिज्ञापत्र सादर केलेले नाही. परंतु कार्यकर्त्यांना बेकायदा फलकबाजीपासून रोखण्यासाठी काय उपाययोजना केल्या जात आहेत, त्याचे पालन न करणाऱ्या



कार्यकर्त्यांवर काय कारवाई केली जात आहे याबाबत प्रतिज्ञापत्र सादर करू, असे भाजपतर्फे सांगण्यात आले. त्यानंतर ८० हून अधिक टक्के बेकायदा फलकबाजीही राजकीय पक्षांकडूनच केली जात असल्याचेही नमूद करत न्या. अभय ओक आणि न्या. अजय गडकरी यांच्या खंडपीठाने सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांना कारवाईबाबत सूचक इशारा दिला.

एवढेच नव्हे, तर बेकायदा फलकबाजी न करण्याबाबतचे बंधन केवळ हमी देणाऱ्या राजकीय पक्षांनाच लागू आहे. मात्र ज्या दोन महत्त्वाच्या राजकीय पक्षांनी (शिवसेना आणि काँग्रेस) हमी दिलेली नाही त्यांच्याकडून सर्रास बेकायदा फलकबाजी केली जात आहे. त्यांना याबाबतचे कुठलेच बंधन नाही, अशी भावना कार्यकर्त्यांमध्ये आहे. शिवाय या दोन पक्षांनाही हे बंधन उच्च न्यायालयाचे आहे याचा विसर पडलेला आहे, ही बाब राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने ॲड्. युवराज नरवणकर यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. त्यांचे म्हणणे मान्य करत बेकायदा फलकबाजी करणारे या पक्षांचे कार्यकर्ते आणि नेत्यांची नावे सादर करण्यात यावी. त्यांनाही नोटीस बजावली जाईल, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

# 'फेसबुक फ्रेंड'ने कल्याणच्या रहिवाश्याला अडीच कोटींना गंडवले

**मुंबई** - सोशल मीडियाचा वापर हल्ली सगळेचजण करतात. मग ते फेसबुक असो की ट्विटर किंवा इतर माध्यमे असोत. मात्र याच फेसबुकमुळे कल्याणच्या एका नागरिकाला अडीच कोटींचा फटका बसला आहे. नायजेरिन हॅकर्सनी आपले अडीच कोटी एका महिलेच्य माध्यमातून लुटले असा आरोप या कल्याणच्या नागरिकाने केला आहे. स्वप्नील धामणकर असे या माणसाचे नाव आहे. आपली अडीच कोटींना फसवणूक झाल्याचा आरोप त्याने केला आहे.



स्वप्नील धामणकर हे रॉयल थाइ दुतावासात वरिष्ठ व्हिसा ऑफिसर म्हणून काम करतात. स्वप्नील धामणकर हे त्यांची पत्नी अमृता, मुलगा अभिनेश आणि मुलगी संस्कृती सोबत कल्याणमध्ये राहतात. खडकपाडा भागातील महावीर हाइट्स या सोसायटीत त्यांचे घर आहे. ऑगस्ट २०१७ मध्ये स्वप्रील धामणकर यांना एका महिलेची फेसबुक फ्रेंड रिक्वेस्ट आली. या महिलेचे प्रोफाइलवरचे नाव मरियम खुर्शीद असे होते. मी या महिलेची फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारल्यानंतर ती माझ्याशी चॅटद्वारे बोलू लागली. याच चॅटमध्ये मरियमने मला सांगितले की तिचा नवरा अमेरिकेच्या लष्करात काम करत होता आणि त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर तिच्या दीराने तिला तेहरान या ठिकाणी येण्यास भाग पाडले असेही मरियमने सांगितल्याचे धामणकर यांनी सांगितले. तसेच आपल्याला एक बारा वर्षांचा मुलगा असूनही दीर लग्नासाठी आपल्यावर दबाव टाकत असल्याचेही तिने सांगितले.

यानंतर एकेदिवशी मरियमने मला सांगितले की तिच्या नवऱ्याचे १८ लाख यूएस डॉलर्स म्हणजे भारतीय चलनाप्रमाणे सुमारे अडीच कोटी रुपये मला सुरक्षित ठेवायचे आहेत. तसेच आपल्याला भारतात शिफ्ट व्हायचे आहे असेही मरियमने सांगितल्याचे धामणकर यांनी म्हटले आहे. यासाठी तिने माझी मदतही मागितली. तसेच मला भारतात येऊन स्थायिक व्हायचे आणि तिथेच स्वतःचा व्यवसाय करायचा आहे असेही मरियमने सांगितले. ऑगस्ट २०१७ मध्ये मला एका माणसाचा कॉल आला ज्याने स्वतःची ओळख कस्टम ऑफिसर म्हणून करून दिली. त्याने माझ्याकडे ६ लाख ८० हजार रुपये कर स्वरूपात भरण्याची मागणी केली. अँटी टेररिस्ट कोड आणि ट्रान्सपोर्ट चार्जेससाठी एवढे शुल्क भरावे लागेल असेही या ऑफिसरने सांगितले. मरियमने तुमच्या नावे जो डॉलर्सचा बॉक्स पाठवला आहे त्याचे हे शुल्क आहे असेही त्याने सांगितले. ज्यानंतर मी बँक अकाऊंटमध्ये ६ लाख ८० हजार रुपये भरले. हे पैसे भरल्यानंतर सप्टेंबर महिन्यात जॉन्स स्कॉटन नावाच्या एका माणसाने मला फोन केला आणि मी मुंबईत पोहचलो असून तुमचा डॉलरचा बॉक्स घेऊन कल्याण या ठिकाणी येतो आहे असे सांगितले.

# भाजप हायटेक प्रचाराचे रान उठवणार: देशभर कॉल सेंटरचे जाळे

**मुंबई** - 'फिर एक बार मोदी सरकार' असा संकल्प करून लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी भाजपने जय्यत तयारी केली असून प्रत्येक चार लोकसभा मतदारसंघांच्या एका गटासाठी (क्लस्टर) एक कॉल सेंटर कार्यान्वित करण्यात आले आहे. मोदी सरकारच्या योजनांच्या देशभरातील २२ कोटी लाभार्थ्यांची मतदारसंघनिहाय यादी या कॉल सेंटर्सकडे सोपवण्यात आली असून, 'हा लाभ मोदी सरकारमुळेच मिळाला' याची जाणीव करून देण्यासाठी कार्यकर्ते कामाला लागणार आहेत.

ग्रामीण भागात व शेतकऱ्यांमध्ये असंतोष असल्याचे चित्र माध्यमांद्वारे वारंवार मांडले जात असून तीन राज्यांमधील विधानसभा निवडणुकांतील पराभवामुळे भाजप अडचणीत असल्याची चर्चाही सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर प्रचारासाठी कार्यकर्त्यांबरोबरच कॉल सेंटरचाही उपयोग करण्याचे भाजपने ठरवले आहे. मोदी सरकारच्या उज्ज्वला, सौभाग्य, पंतप्रधान आवास योजना अशा विविध योजनांचे २२ कोटी लाभार्थी हे आपले संभाव्य मतदार असल्याचे भाजपने निश्चित केले असून त्यांच्याशी सतत संवाद हे



धोरण ठेवण्यात आले आहे.

देशातील ५४३ लोकसभा मतदारसंघांची विभागणी प्रत्येकी चार मतदारसंघांच्या एक गटात करण्यात आली आहे. अशा प्रत्येक गटासाठी एक कॉल सेंटर सुरू करण्यात आले आहे. मतदारसंघांचा आकार-मतदारसंख्या लक्षात घेऊन प्रत्येक कॉल सेंटरमध्ये २०० ते ५०० तरुण-तरुणींना नेमण्यात आले आहे. प्रत्येक कॉल सेंटरला त्यांच्या अखत्यारीतील लोकसभा मतदारसंघातील मोदी सरकारच्या लाभार्थ्यांची यादी देण्यात आली आहे. मतदान होईपर्यंत या लाभार्थ्यांशी सतत संवाद साधण्यात येईल. कॉल सेंटरमधून जाणाऱ्या संदेशाबरोबरच भाजपचे कार्यकर्तेही या लाभार्थ्यांशी प्रत्यक्ष भेट घेऊन संवाद साधत आहेत. एका कार्यकर्त्यांकडे सरासरी चार लाभार्थी असे समीकरण त्यासाठी ठरवण्यात आले आहे. या भेटींची नोंद या कार्यकर्त्यांनी 'नमो ॲप'मध्ये करायची आहे. अशा रीतीने सतत संवादातून मोदी सरकारच्या विरोधात सुरू असलेल्या प्रचाराला उत्तर देता येईल, असा भाजपचा विचार आहे.

मोदी सरकारच्या लाभार्थ्यांबरोबरच भाजपचे ११ कोटी ऑनलाइन सदस्य झाले आहेत. या मंडळींशीही संवाद साधण्याची जबाबदारी कॉल सेंटरकडे देण्यात आली आहे. लाभार्थी आणि ११ कोटी ऑनलाइन सदस्यांशी सतत संवादातून जवळीक साधून पुन्हा मोदी सरकारसाठी मतदान करण्यास त्यांचे मन वळवता येईल आणि दिल्लीत पुन्हा भाजपचे सरकार आरूढ होईल, असे गणित भाजपने मांडले आहे.

# शस्त्रक्रियेनंतर पाच रुग्णांना आले अंधत्व

## महापालिका रुग्णालयातील हलगर्जीपणामुळे दृष्टिहीन झाल्याची धक्कादायक बाब आली समोर

**मुंबई** : महापालिका रुग्णालयातील हलगर्जीपणामुळे पाच रुग्ण दृष्टिहीन झाल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. जोगेश्वरी येथील बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा रुग्णालयात हा प्रकार घडला आहे. मोतीबिंदूची शस्त्रक्रिया करून लेन्स बसविल्यानंतर सातपैकी पाच रुग्णांना जंतू संसर्ग झाल्याने त्यांची दृष्टी गेली. या घटनेचे तीव्र पडसाद उमटताच या प्रकरणाची चौकशी करून लेखी अहवाल सादर करण्यात येईल, असे आश्वासन प्रशासनाने दिले आहे. घटना घडून १५ दिवस झाले,तरी अद्याप कोणावर कारवाई झालेली नाही.



ट्रॉमा रुग्णालयात सात रुग्णांवर ४ जानेवारीला शस्त्रक्रिया करण्यात आली. दोन दिवसांनी ६ जानेवारी रोजी त्यांच्या डोळ्यांची तपासणी केली असता, त्यांच्या डोळ्यांत जंतू संसर्ग झाल्याची लक्षणे दिसून आली, तसेच त्यांचे डोळे लालसरही झाले होते. त्यामुळे या सात रुग्णांना तातडीने पालिकेच्या केईएम रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, त्यातील फातिमाबी शेख, रत्नमा सन्याशी, रफिक खान, गौतम गव्हाणे व संगिता राजभर या रुग्णांची दृष्टी वाचविण्यात डॉक्टरांना यश आले नाही. त्यांचे शस्त्रक्रिया केलेले डोळे निकामी झाले आहेत. पालिकेच्या अक्षम्य हलगर्जीपणाची चौकशी करावी व यासाठी जबाबदार व्यक्तिंवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी भाजपाचे अभिजीत सामंत यांनी स्थायी समितीच्या बैठकीत केली. या प्रकरणाची चौकशी करून लेखी माहिती स्थायी समितीपुढे सादर करण्यात येईल, असे आश्वासन अतिरिक्त आयुक्त विजय सिंघल यांनी या वेळी दिले.

# मुंबईतील सामान्यांसाठीची मोक्याची जागा पत्रकारांच्या झोळीत!

**मुंबई** - लोकसभा निवडणुकांची वातावरणनिर्मिती सुरू झाली असतानाच सरकारी कृपेने मुंबईतील एक मोक्याची जागा पत्रकारांच्या झोळीत पडली आहे! विशेष म्हणजे या जागी उभ्या राहणाऱ्या टोलेजंग इमारतीतील ५० टक्के जागा या मंत्रालय आणि राजकीय घडामोडींचे वार्तांकन करणाऱ्या पत्रकारांसाठी आरक्षित राहील, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच गुरुवारी जाहीर कार्यक्रमात केली आहे.

आपल्या निर्णयाचे समर्थन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ''गेल्या अनेक वर्षांत पत्रकारांना मुंबईत जागा देण्यात आलेली नाही. त्यांच्यातील कित्येकांना बाजारभावानुसार जागा विकत घेणेही शक्य होत नाही. इलेक्ट्रॉनिक माध्यमे



आणि वृत्तपत्रसृष्टीतूनही पत्रकारांच्या निवासासाठी मागणी होत होती.''

सरकारी योजनेनुसार पत्रकारांना २५० घरे दिली जाणार आहेत. 'म्हाडा'तर्फे या योजनेची अंमलबजावणी होणार आहे. ही योजना मार्गी लावण्यासाठी सरकारने महाराष्ट्र हाऊसिंग आणि क्षेत्रविकास कायदा १९८१मधील १३ (२) या कलमाचा वापर केला आहे. याआधी उच्च न्यायालयातील न्यायाधीशांसाठी उच्चउत्पन्न गटातील गृहनिर्माण योजना तडीस नेण्यासाठी या कलमाचा ऑगस्ट २०१५मध्ये वापर झाला होता. त्यावेळी ओशिवरा येथे ३२ हजार ३०० चौरस फुटाचा भूखंड देण्यात आला होता. त्याआधी काँग्रेस सरकारने २००८मध्ये सरकारी अधिकाऱ्यांच्या गृहनिर्माणासाठी कलिना येथे भूखंड देण्याकरिता या कलमाचा वापर केला होता आणि त्यावरून बरेच वादंग निर्माण झाले होते. एका वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याने नाव गोपनीय ठेवण्याच्या अटीवर सांगितले की, ''पत्रकारांच्या इमारतीसाठीचा भूखंड हा राज्याच्या महसूल खात्याचा असून विशेष बाब म्हणून तो अत्यल्प दराने म्हाडाकडे सुपूर्द करण्यात आला आहे.'' पत्रकारांच्या या इमारतीसाठी पत्रकारांची प्रस्तावित गृहनिर्माण संस्था आणि मुख्यमंत्री यांच्यात १० ऑक्टोबर २०१८ रोजी बैठक झाली. त्यानंतर तो प्रस्ताव दिला गेला. २३ जानेवारीला पत्रकारांच्या गृहनिर्माणासाठी भूखंड देता यावा यासाठीच्या आवश्यक तरतुदी केल्या गेल्याचे समजते.

पत्रकार या वर्गवारीत अनेकजणांचा भरणा होऊ शकतो. त्यामुळे खऱ्या पत्रकारांना घरे मिळावीत यासाठी मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाने काही प्रमाणात घरे राखीव ठेवण्याची मागणी केली आहे. या गृहनिर्माण संस्थेचे मुख्य प्रवर्तक दिलीप सपाटे यांनी सांगितले की, ''ज्या पत्रकारांना याआधी गृहनिर्माण योजनांतून लाभ मिळाला आहे त्यांना या योजनेत घरे मिळू नयेत, यासाठी ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक असली पाहिजे आणि जागा मिळालेल्यांची नावेही जाहीर झाली पाहिजेत.''

# 'ट्राय'चे नवे नियम १ फेब्रुवारीपासून लागू

**मुंबई** - ग्राहकांना हव्या असलेल्या वाहिन्या निवडण्याचा हक्क मिळवून देणाऱ्या दूरसंचार नियामक प्राधिकरणाच्या (ट्राय) नव्या नियमांनुसार झी, स्टार, कलर्स, सोनी आणि इतर प्रक्षेपण कंपन्यांनी वाहिन्यांच्या किमती आणि पॅक जाहीर केल्यानंतर आता डीटीएच ऑपरेटर, एमएसओंनी (मल्टीपल सिस्टीम ऑपरेटर) आपापल्या पातळीवर या नियमांची अंमलबजावणी करण्याचा निणऱ्य घेतला आहे.



हॅथवे, डीश टीव्ही, एअरटेल डिजिटल, सिती नेटवर्क आणि डेन नेटवर्कचा यामध्ये समावेश आहे. ग्राहकांना 'ट्राय'ने आखून दिलेल्या नियमानुसार सेवा देण्यासाठी या डीटीएच ऑपरेटर, एमएसओनी आपली संकेतस्थळे अद्ययावत केली.

ग्राहकांसाठी वाहिन्यांच्या नव्या किमती संकेतस्थळावर प्रदर्शित केल्या आहेत. त्यामुळे ग्राहकांना निवड करणे सोपे जाईल. हवी ती वाहिनी निवडल्यामुळे मासिक शुल्क कमी होईल, आता प्रक्षेपण कंपन्या आणि ग्राहकांमधील दुवा म्हणूनच डीटीएच ऑपरेटर काम करणार आहे, असेही एअरटेलकडून सांगण्यात आले. डीटीएच ऑपरेटरकडून आता नव्या किमतीनुसार पॅक बनवले जात आहेत. त्यामुळे २०० रुपयापासून ते ५०० रुपयांपर्यंत वेगवेगळे पॅक ग्राहकांना उपलब्ध होणार आहेत. हॅथवेने महाराष्ट्र, कर्नाटक, उडिशा, पश्चिम बंगाल, सिक्कीम अशा राज्यांनुसार विविध पद्धतीने ग्राहकापर्यंत पोहोचण्यासाठी वाहिन्यांचे सुधारित किमतीनुसार नव्याने पॅकेज बनवले आहेत. यामध्ये महाराष्ट्रात त्यांनी सहा पॅकेजेसची किंमत २७० ते ३५० च्या दरम्यान ठेवली आहे. या पॅकेजना आपला चॉईस १, आपला चॉईस २, आपला चॉईस ४, आपला फॅमिली फिक्शन पॅक, आपला फॅमिली स्पोर्ट्स पॅक अशी नावे दिली आहेत. टाटा स्कायने २४ जानेवारीपासून 'ट्राय'च्या वाहिन्या निवडीच्या नव्या नियमानुसार ग्राहक सेवा देणे मान्य केले आहे.

# वांद्रेतील एमआयजी क्लबला म्हाडाकडून ५३ कोटींचा दंड

**मुंबई** : वांद्रे पूर्वमधील प्रख्यात एमआयजी क्लबला म्हाडाने दणका दिला आहे. एमआयजी क्लबने म्हाडाशी झालेल्या भूखंडाच्या भाडेतत्वाच्या कराराचा भंग केला आहे. करारानुसार विनामूल्य शाळा बांधून न देणाऱ्या एमआयजी क्लबला म्हाडाने गुरुवारी ५३ कोटींचा दंड ठोठावला. लवकरच क्लबला नोटीस पाठवून दंड वसूल करण्यात येणार असल्याचे म्हाडा प्राधिकरणाचे अध्यक्ष उदय सामंत यांनी सांगितले. म्हाडाने काही वर्षांपूर्वी एमआयजी येथील भूखंड एमआयजी क्लबला भाडतत्त्वावर दिला होता.

# एटीएसकडून आणखी एका संशयित दहशतवाद्याला अटक

**मुंबई** - महाराष्ट्र एटीएसने शनिवारी मुंब्रा येथून एका संशयित दहशतवाद्याला अटक केली आहे. या दहशतवाद्याला औरंगाबाद कोर्टात हजर करण्यात आले आहे. गेल्या आठवड्यापासून एटीएसने संशयित दहशतवाद्यांची धरपकड करण्याची कारवाई सुरू केली आहे.

ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा येथून एका २४ वर्षीय आरोपीकडून लॅपटॉप, हार्डडिस्क, टॅबलेट, पेनड्राईव्हस, राऊटर असे साहित्य जप्त करण्यात आले आहे. आयसिस या दहशतवादी संघटनेसाठी काम करत असल्याच्या संशयावरून एटीएसने २२ जानेवारीला मुंब्रा आणि औरंगाबादमधून एकूण ९ जणांना अटक केली होती. आता ही संख्या १० वर गेली आहे.

तलहा उर्फ अबूबकर हनिफ



पोतरीक, रा. एम्ब्रॉड टॉवर, दोस्ती प्लॅनेट नॉर्थ, शील डायघर, मुंब्रा असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून ही कारवाई औरंगाबाद एटीएसने मुंब्र्यात जाऊन केली. अबूबकर हा ऑगस्ट २०१८ ते जाने. २०१९ या काळात राज्यात आयसिस कडून होणाऱ्या उपद्रवांचा माहितगार होता. गेल्या सात महिन्यात आयसिसच्या झालेल्या संपूर्ण बैठकांचा तपशील अबूबकरकडे होता.एटीएएसने त्याला १४ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी मागितली होती. परंतु न्यायालयाने ५ फेब्रुवारीपर्यंत कोठडी मंजूर केली आहे.

दरम्यान, औरंगाबादमध्ये कैसर कॉलनी, गणेश कॉलनी या भागात एटीएसचे पथक स्लीपरसेलमधे समाविष्ठ असलेल्या संशयितांची कसून चौकशी करत आहे.अशी माहिती वरिष्ठ सुत्रांनी दिली आहे.

## संपादकीय...



संपादक:-
दिपक मोरेश्वर नाईक

# श्वास गुदमरतोय!

गावात दही आणि ताक कधीच विकले जायचे नाही. ते विकले तर जनावराचा पान्हा आटेल, अशी भीती असायची. आता दही-ताक विकून बंगले बांधले जात आहेत. खेडेगावात पिण्याचे पाणी विकले जाईल, असे दहा वर्षापूर्वी कोणी म्हटले असते, तर त्याला वेड्यात काढले गेले असते. आज खेड्यांत प्रत्येक घरात जारच्या पाण्यावर तहान भागते आहे आणि या जारच्या धंद्यावरच अनेकांचे बंगले उभे राहत आहेत. निसर्गाचा हा उलटा फेरा आम्ही माणसांनीच ओढवून घेतला आहे. त्यामुळे उद्या ऑक्सिजन विकत घेऊन जगण्याची वेळ आली, तर फार नवल वाटायला नको. ऑक्सिजनचे सिलिंडर सोबत घेऊनच बाहेर पडावे लागेल. माणसाने प्रगतीचा वेग असाच कायम ठेवला, तर हा दिवसही फार दूर नाही. ही चिंता वाटण्याचे कारण म्हणजे देशभरातील प्रदूषित शहरांमध्ये महाराष्ट्रातील १७ शहरांचा समावेश झाला आहे. यात मुंबई, पुण्यासह नाशिक, औरंगाबाद, चंद्रपूर, जालना, लातूर, जळगाव, सोलापूर, सांगली, कोल्हापूर, नागपूर व अमरावती यांचा समावेश आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सफर आणि टेरीकडून देशभरातील प्रदूषणाची पातळी मोजल्यानंतरही धक्कादायक माहिती समोर आली



आहे. देशात सर्वाधिक प्रदूषण महाराष्ट्रात होते. दुसरा नंबर उत्तर प्रदेशचा आहे. या राज्यातील १५ शहरे सर्वाधिक प्रदूषित आहेत. पंजाबमधील आठ, हिमाचल प्रदेशातील सात, आंध्र प्रदेशातील पाच, कर्नाटकातील चार आणि गुजरातमधील सुरत, तामिळनाडूतील तुतिकोरीन ही शहरे महाराष्ट्रातील १७ शहरांच्याच पंक्तीत आहेत. या प्रदूषित शहरांमध्ये कार्बन डायऑक्साइड, नायट्रोजन डायऑक्साइड, सूक्ष्म धूलिकण, अतिसूक्ष्म धूलिकणांचे प्रमाण केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने निश्चित केलेल्या मानकांपेक्षा अधिक आहे. केंद्राने निश्चित केलेल्या मानकानुसार, 'पार्टिक्युलेट मॅटर १०'चे वार्षिक सरासरी प्रमाण ६० आणि नायट्रोजन डायऑक्साइडचे वार्षिक सरासरी प्रमाण ४० पेक्षा अधिक असल्यास त्या शहरांना प्रदूषित शहरे म्हटले जाते. वरील सर्व शहरांनी ही पातळी ओलांडली आहे. प्रदूषणाचे हे संकट रोखण्यासाठी केंद्रीय वन आणि पर्यावरण मंत्रालयाने 'नॅशनल क्लीन एअर प्रोग्राम' जाहीर केला आहे. याद्वारे या शहरांतील प्रदूषण ३५ टक्क्यांनी कमी करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. याअंतर्गत पहिल्या टप्प्यात देशातील सर्वाधिक प्रदूषित शहरांकडून हवेच्या प्रदूषण नियंत्रणाचा आराखडाही मागविण्यात आला आहे. आश्चर्य म्हणजे मुंबई, पुणे, अमरावती, औरंगाबाद, जालना, कोल्हापूर आणि लातूरने पाठविलेला आराखडा फेटाळून लावण्यात आला आहे. कळस म्हणजे या शहरांनी अद्याप त्याचे पुनर्सादरीकरणही केले नाही. याचा अर्थ स्वतःच्या शहराला प्रदूषणमुक्त करावे याचा आराखडाही त्यांच्याकडे नाही. गेल्या २० वर्षात महाराष्ट्रातील प्रकाश प्रदूषणाच्या पातळीने 'अत्युच्च' पातळी गाठली आहे. भारताची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत तर प्रकाश प्रदूषण सर्वाधिक आहे. वाहनांचे प्रदूषण, प्रकाश-पाणी प्रदूषण, हवेतील धूलिकण, वाढते औद्योगीकरण आणि वाढलेली वृक्षतोड या सर्व बाबींचा अतिरेक होत असल्याचा हा दुष्परिणाम आहे. रस्त्यांचे काँक्रिटीकरण मोठ्या वेगाने होत आहे. मागच्या सरकारच्या काळात दरदिवशी ६९ कि.मी. रस्ते व्हायचे. या सरकारने ही गती दुप्पट केली असून, दरदिवशी १३४ कि.मी. रस्ते तयार केले जात आहेत. या विकासवाटेचा आनंद साजरा करायचा की, रस्त्यांसाठी प्रचंड प्रमाणात होणाऱ्या वृक्षतोडीचे सुतक पाळायचे, याचेच कोडे आहे. वाढत्या काँक्रीट रस्त्यांमुळे उष्णता वाढण्याचा धोका निर्माण झाला आहे. स्पर्धेत टिकायचे तर विकास व्हायलाच हवा; पण विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा ऱ्हास करून कसे चालेल? आहे ती झाडे तोडायची आणि नव्याने वृक्षलागवड करण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्चायचे. अशा मोठमोठ्या इव्हेंटमधून हाती काहीच लागणार नाही. शहरीकरणाचा वेग प्रचंड आहे. खेड्यातून शहरात येणाऱ्यांची संख्या वाढतच आहे. प्रश्न केवळ लोकसंख्येचाच नाही, तर त्यासोबत निर्माण होणाऱ्या अनेक समस्यांचा आहे. वाढती लोकसंख्या, वाढती वाहनांची संख्या आणि पर्यावरणाचा ऱ्हास करून त्यांना दिल्या जाणाड्या सुखसुविधा पाहिल्या, तर कोणत्याच शहराला 'दिल्ली' दूर नाही. 'दिल्लीत आता न राहिलेलेच बरे' असे विधान गेल्याच आठवड्यात सर्वोच्च न्यायालयाने प्रदूषणासंबंधित याचिकेवर सुनावणीदरम्यान केले होते. उद्या ही वेळ आपल्या शहरावरही येऊ शकते. त्यामुळे प्रत्येकाने आजच काळजी घेतलेली बरी.

# संकल्पाचा अर्थ

***संसदेचे हिवाळी अधिवेशन संपले ८ जानेवारी रोजी आणि नवे, अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होईल या आठवड्यात ३१ जानेवारी या दिवशी. या दोन अधिवेशनांत जेमतेम २३ दिवसांचा फरक असेल. म्हणजेच ३१ जानेवारी या दिवशी सुरू होणारे संसदेचे अधिवेशन हे या वर्षातील पहिले अधिवेशन नसेल. प्रथा अशी की नव्या वर्षाच्या पहिल्या अधिवेशनाचा प्रारंभ पहिल्याच दिवशी राष्ट्रपतींच्या अभिभाषणाने होतो. त्या अर्थी या आठवड्यात सुरू होणाऱ्या अधिवेशनाची सुरुवात राष्ट्रपतींच्या भाषणाने होणे अपेक्षित नाही. कारण अर्थातच हे पहिले अधिवेशन नाही.***




तरीही राष्ट्रपती कोविंद यांच्या अभिभाषणाने संसदेच्या अधिवेशनास ३१ जानेवारीस सुरुवात होईल. याचे कारण तीन आठवड्यांपूर्वी लोकसभा संस्थगित (सीने डाय) केली गेली. त्यानंतर दोनच दिवसांनी, १० जानेवारीस, राष्ट्रपतींनी ती संस्थगित (प्रोरोग, विसर्जित नव्हे) केल्याने अधिवेशन संपले. याचा अर्थ ती नव्याने पुनर्चलित करणे आले. तशी ती केल्यानंतर संसदेचे अधिवेशन ३१ जानेवारीस सुरू होईल. ही सर्व तांत्रिकता समजून घेणे महत्त्वाचे.

अशासाठी की यामुळे तांत्रिकदृष्ट्या ३१ जानेवारीस सुरू होणारे संसदेचे अधिवेशन हे यंदाचे पहिले अधिवेशन ठरते. आधीचे अधिवेशन जरी यंदाच्याच ८ जानेवारीस संपलेले असले तरी त्यानंतर संसद संस्थगित केली गेल्याने नवे अधिवेशन पुकारावे लागले. तसे यंदाच्या वर्षात पहिल्यांदाच होणार असल्याने राष्ट्रपतींना अभिभाषणाची संधी मिळेल. ती सत्ताधाऱ्यांसाठी महत्त्वाची. कारण त्यांच्या भाषणातून आपण किती आणि काय काय साध्य केले हे जाहीर करता येते आणि राष्ट्रपतींच्या हातून स्वतःचीच पाठ थोपटून घेण्याची संधी मिळते. निवडणूक वर्षात तर अशी शाबासकी किती महत्त्वाची हे सांगणे न लगे. संसद जर संस्थगित केली गेली नसती तर राष्ट्रपतींना, आणि त्यामुळे सरकारला, ही संधी मिळती ना. म्हणून ही बाब महत्त्वाची. तसेच यामुळे सरकारची आणखी एक सोय यातून होते.

ती म्हणजे अर्थसंकल्पपूर्व पाहणी अहवाल सादर न करण्याची. ३१ जानेवारी रोजी संसदेच्या अधिवेशनाचा राष्ट्रपतींच्या अभिभाषणाने साग्रसंगीत प्रारंभ होईल. सरकारच्या प्रगतीचा आकर्षक आलेख ते सादर करतील आणि दुसऱ्या दिवशी अर्थसंकल्प मांडला जाईल. वास्तविक प्रथा अशी की अर्थसंकल्पाच्या आदल्या दिवशी आर्थिक पाहणी अहवाल सादर केला जातो. परंतु तसे या वेळी केले जाईलच असे नाही. राष्ट्रपतींच्या अभिभाषणाची प्रथा पाळली जाणार आणि अर्थसंकल्पपूर्व पाहणी अहवालाची नाही असे का असा प्रश्न यावर पडू शकेल. त्याचे उत्तर असे की तांत्रिकदृष्ट्या हा अर्थसंकल्प हंगामी असेल. आणि हंगामी अर्थसंकल्पाच्या आधी अर्थसंकल्प पाहणी अहवाल सादर केला नाही तरी चालू शकते. नवे सरकार ज्या वेळी जून वा जुलै महिन्यात आपला संपूर्ण अर्थसंकल्प सादर करेल त्या वेळी हा पाहणी अहवाल सादर केला जाईल. राजकीय संकेत या अर्थाने पाहू गेल्यास वास्तविक त्या वेळी राष्ट्रपतींचे अभिभाषण होणे सयुक्तिक ठरले असते. पण सरकारला अभिभाषणाची आत्ता गरज आहे. आणि पाहणी अहवालाची नाही. राष्ट्रपतींचे अभिभाषण हे नावापुरते असते आणि ते मंत्रिमंडळाने मंजूर केल्याशिवाय सादर होत नाही. म्हणजेच एकाअर्थी ते सरकारचेच भाषण असते. वाचण्याची प्रक्रिया तेवढी राष्ट्रपती करतात. परंतु आर्थिक पाहणी अहवालाचे तसे नाही.

त्यावर सरकारचे नियंत्रण नसते आणि तो पूर्णतः आकडेवारीवर आधारित असतो. शब्द फसवू शकतात. आकडे नाही. त्यामुळे अर्थसंकल्पपूर्व पाहणी अहवालात सादर होणारी आकडेवारी ही खरी आणि म्हणून राजकीयदृष्ट्या अडचणीची ठरू शकते. त्यातही निवडणुकीचे वर्ष असेल तर अर्थसंकल्पपूर्व पाहणी अहवालात सादर होणारी आकडेवारी ही संकटास निमंत्रण देणारी ठरण्याचा धोका अधिक. विशेषतः कृषी आणि रोजगारनिर्मिती याचा साद्यंत तपशील अर्थसंकल्पपूर्व पाहणी अहवालातून दिला जातो. कारण हा अहवाल सरत्या आर्थिक वर्षांचा असतो तर अर्थसंकल्प १ एप्रिल या दिवशी सुरू होणाऱ्या आगामी आर्थिक वर्षांचा असतो. पाहणी अहवाल गेल्या वर्षीसाठी असल्याने त्यात काय साध्य झाले वा झाले नाही, याचा अधिकृत तपशील सादर केला जातो. निवडणूक वर्षांत त्यामुळे विरोधकांहाती अनावश्यक दारूगोळा पुरवला जाण्याचा धोका असतो. अर्थसंकल्पपूर्व पाहणी अहवालच सादर होणार नसल्यास तो आता टळेल. त्याच वेळी राष्ट्रपतींच्या अभिभाषणातून स्वतःस प्रमाणपत्र मात्र घेता येईल.

संसदीय प्रथांचे असे निवडक पालन काही पहिल्यांदाच होते आहे असे नव्हे. त्यामुळे विद्यमान सरकारला त्यासाठी दोष देण्यासाठी वेगळे करता येणार नाही. हे जे आहेत हे नियम नव्हेत. त्या प्रथा आहेत. त्यांचे उल्लंघन आपल्याकडे सर्रास सरसकट होतच असते. तेव्हा याच परंपरेचा भाग म्हणून १ फेब्रुवारीचा अर्थसंकल्प सादर केला जाईल. वस्तुतः निवडणूक वर्षांत सादर होते ते केवळ लेखानुदान. कारण उंबरठ्यावर आलेल्या निवडणुकांत काय होईल याचे भाकीत वर्तवणे अशक्य असल्याने कोणत्याही सरकारने निवडणूकपूर्व वर्षांत पूर्ण अर्थसंकल्प सादर करू नये. हादेखील नियम नव्हे. केवळ प्रथा. ती सुरू झाली कारण संपूर्ण अर्थसंकल्प सादर करून पुढील सरकारचे हात बांधून ठेवणे योग्य नव्हे या उदार लोकशाही मानसिकतेतून. म्हणून केवळ लेखानुदान सादर केले जाते. लेखानुदान म्हणजे पुढील अर्थसंकल्प सादर होईपर्यंत आवश्यक त्या सरकारी खर्चास संसदेची मंजुरी घेणे. ती आवश्यक असते. कारण संसदेने मंजुरी दिल्याखेरीज सरकारला एक रुपयादेखील खर्च करता येत नाही. निदान त्याने तसा तो करू नये, अशी अपेक्षा असते. ती पायदळी तुडवली की काय होते हे अमेरिकेत जे काही सुरू आहे, त्यावरून समजून घेता येईल. तेथे अध्यक्ष अमेरिका-मेक्सिको सीमेवर प्रचंड मोठी भिंत बांधू पाहतात जेणेकरून त्या देशातून येणाऱ्या स्थलांतरितांना रोखता येईल. पण त्यास तेथील प्रतिनिधी सभागृहाची मंजुरी नाही. कारण विरोधी पक्षीय डेमोक्रॅट्सचे त्या सदनात बहुमत आहे आणि त्यांनी ट्रम्प सरकारचा हा खर्च प्रस्ताव रोखून धरलेला आहे. परिणामी सरकारी खर्च बंद करण्याची वेळ आणि सफाई कामगार आदींचे वेतन रोखले गेले. ट्रम्प आणि डेमोक्रॅट्स यांच्यातील या लठ्ठालठ्ठीत त्या देशातील सरकारवर हंगामी पंगुत्वाची वेळ आली. असे होऊ नये म्हणून संसदेची मंजुरी सरकारी खर्चास महत्त्वाची. आगामी काही महिन्यांपुरतीच ती घेणे म्हणजे लेखानुदान.

पण निवडणुकीनंतरही आपलेच सरकार असेल अशी खात्री विद्यमान सरकारला असल्याने हे सरकार केवळ लेखानुदानावर थांबेल असे दिसत नाही. अर्थमंत्री ते बिनखात्याचा मंत्री असा प्रवास दुसऱ्यांदा करणारे अरुण जेटली यांच्यापासून कृषिमंत्री राधामोहन सिंग अशा अनेकांनी तसे सूचित केले असून आर्थिक निकड लक्षात घेऊन अर्थसंकल्पातून विविध उपाययोजना जाहीर केल्या जातील, असे स्पष्ट केले आहे. जेटलींच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे हा हंगामी अर्थसंकल्प आता पीयूष गोयल सादर करतील. विविध मंत्री आदींकडून केले जाणारे भाष्य लक्षात घेता तो तितका हंगामी असेलच असे नाही. कृषी आणि नोकरदार वर्गासाठी तीत काही लक्षणीय घोषणा असतील अशी लक्षणे दिसतात. ती किती खरी वा अस्थानी हे शुक्रवारी कळेलच. परंतु त्याआधी संकल्पामागील 'अर्थ' काय होता हे मात्र- आर्थिक पाहणी अहवालच नसल्यास- कळणार नाही.

## शीळफाटा ते बदलापूर मार्गावर मेट्रोचा विस्तार

**ठाणे :** भिवंडी आणि कल्याणपाठोपाठ शीळफाटा ते बदलापूरपर्यंत मेट्रोसेवेचा विस्तार करण्याची तसेच नियोजित टिटवाळा-मुरबाड रेल्वे मार्गाच्या कामासाठी राज्य शासनाकडून ५० टक्के निधी देण्याची घोषणा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी भिवंडीतील एका कार्यक्रमात बोलताना केली.

ठाणे-वसई जलवाहतूक प्रकल्प आणि मुंबई-वडोदरा द्रुतगती महामार्गाच्या कामाचे भूमिपूजन १५ दिवसात करण्यात येणार असल्याचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी कार्यक्रमात बोलताना जाहीर केले.

मुंबई-नाशिक महामार्गावरील ठाणे ते वडपे रस्त्याचे आठ पदरीकरण तसेच शहापूर ते खोपोली रस्त्याचे चार पदरीकरण या कामाचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते गुरुवारी भिवंडीत झाले. या कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी शिळफाटा ते बदलापूर मेट्रो सेवेचा विस्तार करण्याची घोषणा केली. तसेच या प्रकल्पाची व्यवहार्यता तपासण्यात येईल आणि त्यामधील अडचणी दूर करून प्रकल्प आराखडा तयार करण्यात येईल. त्यानंतर या प्रकल्पास मान्यता देण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. मेट्रो आणि रस्ते प्रकल्पामुळे भिवंडीचा विकास होईल. लॉजिस्टिक पार्कमुळे रोजगार उपलब्ध होईल, असे त्यांनी सांगितले. तसेच माणकोली आणि रांजणोली पुलाचे रखडलेले काम १५ ऑगस्टपर्यंत, तर दुर्गाडी पुलाचे कामही लवकरच पूर्ण करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. मुंबई, ठाण्यासह कोकणात जलमार्गाने वेगाने वाहतूक होऊ शकेल. त्यामुळे एमएमआर क्षेत्रात जलवाहतुकीसाठी पुढील आठवड्यात आराखड्याला मंजुरी दिली जाईल. तसेच उच्च न्यायालयाच्या संमतीने दोन महिन्यांत रो-रो प्रकल्पाला मंजुरी दिली जाईल, असेही त्यांनी जाहीर केले.

औरंगाबादेत एअर बसची चाचणी घेण्यात आली असून ठाणे-भिवंडी मार्गावर ही डबल डेकर एअर बस चालविण्याबाबत नियोजन करावे लागेल. तसेच माळशेज घाटाचे कामही लवकरच सुरू करण्यात येणार आहे, असे नितीन गडकरी यांनी सांगितले.

बुलेट ट्रेनच्या तोडीस तोड



असा एक लाख कोटी रुपये खर्चाचा आणि १२ तासांत मुंबई ते दिल्ली अंतर कापणाऱ्या द्रुतगती महामार्गाचे काम लवकरच सुरू होणार असल्याचे त्यांनी सांगितले. ठाणे जिल्ह्यातील आठ जेट्टींच्या कामांसाठी १०० कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिल्याचेही त्यांनी जाहीर केले. जिल्ह्याच्या आदिवासी भागात जट्रोफाचे उत्पादन वाढविले तर आदिवासी आणि शेतकऱ्यांना उत्पन्न मिळेल तसेच पेट्रोलला पर्याय म्हणून इथेनॉलचा जास्त वापर करता येईल, असे त्यांनी सांगितले.

## एपीएमसीमधून १५०० किलो प्लास्टिक जप्त; प्रदूषण नियंत्रण मंडळाची मोहीम

**नवी मुंबई :** मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मसाला मार्केटमध्ये प्रदूषण नियंत्रण मंडळ व एपीएमसी प्रशासनाने प्लास्टिकचा वापर करणा-यांविरोधात मोहीम राबविली. दोन दिवसांमध्ये १५०० किलो प्लास्टिक जप्त केले असून, ३५ हजार रुपये दंड वसूल केला आहे.

नवी मुंबईमध्ये सर्वाधिक प्लास्टिकची विक्री व वापर बाजार समिती परिसरामध्ये होऊ लागला आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाने यापूर्वी धाडी टाकून प्लॅस्टिकचा मोठा साठा जप्त केला आहे. महानगरपालिकेनेही यापूर्वी अनेक वेळा धाडी टाकून प्लास्टिकची विक्री करणा-यांवर कारवाई केली आहे. यानंतर दोन दिवस बाजार समिती व एमपीसीबीच्या अधिका-यांनी मसाला मार्केटमध्ये संयुक्त



मोहीम राबविली. पहिल्या दिवशी २०० किलो व दुस-या दिवशी तब्बल १३०० किलोचा साठा हस्तगत केला आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाचे क्षेत्र अधिकारी केतन पाटील, इंद्रजीत देशमुख, बाजार समितीचे किरण घोलप, सी. टी. पवार, आर. आर. गुरव यांनी या कारवाईमध्ये सहभाग घेतला होता.

बाजार समितीच्या भाजी मार्केटमध्येही मोठ्या प्रमाणात प्लॅस्टिकचा वापर केला जात आहे. या ठिकाणी परराज्यातून भाजीपाला विक्रीसाठी येतो. इतर राज्यांमध्ये बंदी नसल्याने तेथून प्लॅस्टिकमध्ये भरून कृषी माल विक्रीसाठी पाठविण्यात येतो. एमपीसीबीच्या पथकाने मार्केटमध्ये जनजागृती केली. माल पाठविणा-यांनाही प्लास्टिकचा वापर करू नये, असे आवाहन या वेळी करण्यात आले आहे.

## वसईच्या समुद्रकिनाऱ्यांवर जीवरक्षकांची वानवा

वसई तालुक्यातील विविध समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांचा ओघ वाढत असला तरी या ठिकाणी जीवरक्षक नसल्याचे दिसून येत आहे. समुद्रात होणाऱ्या दुर्घटनांमध्ये वाढ होत असून अनेक किनाऱ्यांवर जीवरक्षक तैनात नसल्याच्या तक्रारी पर्यटकांकडून करण्यात आल्या आहेत.



वसई-विरारमधील समुद्र किनारे पर्यटकांना नेहमी खुणावत असतात. येथील निसर्गरम्य परिसर, शांत आणि विस्तिर्ण किनारे आणि रिसॉर्टमुळे दिवसेंदिवस पर्यटकांचा ओघ विविध किनाऱ्यांवर वाढत आहे. मात्र पर्यटकांचे समुद्रात बुडून मृत्यूमुखी पडण्याचे प्रमाणही वाढत आहे. अर्नाळा, कळंब, राजोडी आदी किनारे धोकादायक ठरत आहे. या किनाऱ्यांवर जीवरक्षक नसल्याने बुडणाऱ्या पर्यटकांना वाचवता येत नसल्याची तक्रार पर्यटक करत आहे. नावापूर, भुईगाव याठिकाणी अजून जीवरक्षक नेमलेले नाही. पण ज्याठिकाणी जीवरक्षक नेमले आहेत, त्या ठिकाणी कोणी बसत नाही, असे पर्यटक सांगतात. जीवरक्षकांना टेहळणी करण्यासाठी असलेले मनोरे रिकामे असतात. या ठिकाणी अनेकदा पर्यटकच बसलेले दिसून येतात.

वसईतील विविध समुद्रकिनाऱ्यांवर बेकायदा रेतीउपसा होत असते. त्यामुळे किनाऱ्याचा भाग खोलगट झालेला आहे. याची कल्पना अनेक पर्यटकांना नसल्याने दुर्घटनांमध्ये वाढ होत आहे. त्यामुळे येथे जीवरक्षक असणे गरजेचे आहे. जीवरक्षक असले तरी पर्यटक त्यांच्या सुचनांकडे दुर्लक्ष करून खोल समुद्रात जातात, असे ग्रामस्थ सांगतात.

# सातव्या वेतन आयोगाची अद्याप अधिसूचनाच नाही

**मुंबई-** राज्य कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्यासाठी अजून अधिसूचना निघाली नसल्याने जानेवारीच्या वेतनात प्रत्यक्ष लाभ मिळणार की नाही, याबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. १ जानेवारी २०१९ पासून सातवा वेतन आयोगाचा प्रत्यक्ष लाभ देण्यावर म्हणजे फेब्रुवारीत मिळणारे वेतन सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशींप्रमाणे देण्यावर मंत्रिमंडळाच्या बैठकीत शिक्कामोर्तब करण्यात आले. आता जानेवारी महिना संपत आला तरी सातवा वेतन आयोग लागू करण्यासंबंधीची अधिसूचनाच अजून निघालेली नाही. त्यामुळे या महिन्याच्या वेतनात त्याचे प्रत्यक्ष लाभ मिळण्याची शक्यता धूसर झाली असल्याने अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये अस्वस्थता आहे.

या संदर्भात अर्थ व नियोजन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याशी संपर्क साधला असता, सातव्या वेतन आयोगाची लवकरच अधिसूचना निघेल, काम सुरू आहे आणि याच महिन्याच्या वेतनात कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगानुसार प्रत्यक्ष लाभ मिळेल, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

सातव्या वेतन आयोगानुसार सर्व



विभागांमधील वेगवेगळ्या पदांची आणि संवर्गाची वेतननिश्चिती करणे आवश्यक आहे. त्याला किमान दीड ते दोन महिन्यांचा कालावधी लागतो. पदनामनिहाय वेतननिश्चितीची पुस्तिका तयार केली जाते. त्यानुसार अधिसूचना काढून ती सर्व विभागांना पाठविली जाते. त्यानुसार वेतन देयके तयार केली जातात.

याबाबत वित्त विभागातील उच्चपदस्थ अधिकाऱ्याने सांगितले की, सातव्या वेतन आयोगानुसार वेतननिश्चितेची पुस्तिका तयार करण्याची प्रक्रिया सुरू आहे, दोन-तीन दिवसात हे काम पूर्ण होईल. परंतु अधिकारी-कर्मचाऱ्यांची वेतन देयके प्रत्येक महिन्याच्या २० ते २५ तारखेपर्यंत कोषागाराला सादर केली जातात.

## ठाण्यातील ६४ अनधिकृत शाळा बंद करण्याचे आदेश

ठाणे महापालिका शिक्षण विभागाने जाहीर केलेल्या ६४ अनधिकृत शाळा बंद करण्याचे आदेश लोकायुक्तांनी दिले असून त्यानुसार शिक्षण विभागाने कारवाई सुरू केली आहे. या शाळेतील दहा हजार विद्यार्थ्यांना महापालिका शाळांमध्ये सामावून घेतले जाणार आहे. मात्र या शाळेतील ४९७ शिक्षकांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळणार आहे.

ठाणे, कळवा, मुंब्रा तसेच दिवा भागात अनधिकृत शाळा सुरू असून अशा शाळांची यादी महापालिका शिक्षण विभागाकडून दरवर्षी जाहीर करण्यात येते. अशा शाळांची यादी गेल्यावर्षी जून महिन्यात शिक्षण विभागाने जाहीर केली होती. त्यामध्ये वागळे इस्टेट, राबोडी, कळवा, मुंब्रा आणि दिवा या भागातील ६४ अनधिकृत शाळांची यादी जाहीर केली होती. या शाळा बंद करण्यासंबंधीचे पत्र लोकायुक्तांनी शिक्षण विभागाला दिले असून त्याआधारे या विभागाने नोटीस बजावून शाळा बंद करण्याच्या सूचना दिल्या आहेत. ठाणे महापालिका क्षेत्रात ६४ अनधिकृत शाळा असून त्यामध्ये इंग्रजी माध्यमांच्या ५१ शाळा आहेत. तर मराठी माध्यमाच्या तीन आणि हिंदी माध्यमाच्या १० शाळा आहेत. या शाळांमध्ये ४९७



शिक्षक आहेत.

या संदर्भात शिक्षण विभागाचे सभापती विकास रेपाळे यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी या वृत्तास दुजोरा दिला. तसेच अनधिकृत शाळेतील विद्यार्थ्यांना महापालिका शाळांमध्ये सामावून घेण्याची प्रक्रिया केली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या शाळांमध्ये १० हजार २६३ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

# मराठा आरक्षणाचा पूर्ण अहवाल द्याः हायकोर्ट




**मुंबईः** मराठा आरक्षणासाठी राज्य मागास प्रवर्ग आयोगाने तयार केलेला अहवाल 'जसाच्या तसा' सर्व याचिकादार आणि प्रतिवाद्यांना देण्याचे निर्देश हायकोर्टाने राज्य सरकारला दिले. या अहवालातील काही भागामुळे कायदा व सुव्यवस्था बिघडू शकते असा दावा राज्य सरकारने केला होता. हा दावा हायकोर्टाने आज फेटाळून लावला. मराठा आरक्षणाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर ६ फेब्रुवारीपासून अंतिम सुनावणी सुरू होणार आहे.

मराठा आरक्षणाला आव्हान देणारी याचिका हायकोर्टात दाखल करण्यात आली आहे. मागील सुनावणीत राज्य मागास प्रवर्गाने तयार केलेला मराठा आरक्षणाबाबतचा अहवाल सादर करण्याची विनंती याचिकाकर्त्यांनी हायकोर्टाला केली होती. मात्र, राज्य सरकारने मागास प्रवर्ग आयोगाचा संपूर्ण अहवाल जाहीर न होण्याची भूमिका मांडली होती. अहवालातील काही भाग आरक्षणासंदर्भात गैरलागू असून त्याला ऐतिहासिक संदर्भ आहेत. हा संदर्भ जाहीर केल्यास समाजात अस्वस्थता पसरण्याची आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची भिती राज्य सरकारने कोर्टात व्यक्त केली होती. मात्र, हायकोर्टाने आजच्या सुनावणीत राज्य सरकारची भूमिका फेटाळून लावत मागास प्रवर्गाचा संपूर्ण अहवाल, कोणताही भाग न वगळता याचिकादार, प्रतिवाद्यांना देण्याचे निर्देश दिले. दरम्यान, एमआयएमचे आमदार इम्तियाज जलील यांनी मराठा आरक्षणाबाबत दाखल केलेली याचिका आज मागे घेतली. काही दिवसआधीच ही याचिका आपण मागे घेणार असल्याचे त्यांनी जाहीर केले होते.

# ऑनलाईन राजकीय जाहिराती देणाऱ्यांची माहिती गुगल करणार उघड




**मुंबई :** सोशल मीडियाचा लोकांकडून प्रभावीपणे वापर होत असल्याचे राजकीय पक्षांच्या लक्षात आल्यापासून आतापर्यंत निवडणुकीच्या प्रचारासाठी ऑनलाईन जाहिरातींचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो आहे. गुगलच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या अशा जाहिरातींची माहिती मार्च महिन्यापासून गुगल सार्वजनिक करणार आहे. यामध्ये प्रामुख्याने राजकीय जाहिराती देणाऱ्या व्यक्तीची आणि संबंधित जाहिरातीची माहिती देण्यात येणार आहे. आगामी लोकसभा-विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून, राजकीय जाहिरांतीबाबत पारदर्शकता निर्माण व्हावी, यासाठी गुगलने हे पाऊल उचलले आहे. यंदाच्या वर्षात महाराष्ट्रात लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. त्यामुळे प्रत्येक पक्ष आता तयारीला लागला आहे. २०१४ च्या निवडणुकींपासून राजकीय आणि निवडणुकींच्या प्रचारासाठी मोठ्या प्रमाणावर ऑनलाईन माध्यमातून जाहिराती केल्या जात आहेत. निवडणुकीच्या काळात निवडणूक आयोगाकडून प्रत्येक उमेदवाराला प्रचारासाठी प्रतिदिन किती रक्कम खर्च करावी, याबाबतीत मर्यादा घातलेली असते. तसेच निवडणुकीच्या प्रचारावर केलेल्या खर्चाचा अहवाल निवडणूक आयोगाला देणे बंधनकारक असते. असे असताना या मर्यादेचे अनेकदा उमेदवारांकडून उल्लंघन केले जाते. त्यामुळे एकूण निवडणुकीच्या प्रचारावर किती खर्च झाला, याची माहिती निवडणूक आयोगाला मिळत नाही.ऑनलाईन पद्धतीने निवडणुकीचा प्रचार केला जातो. या ऑनलाईन जाहिरात पद्धतीत पारदर्शकता आणण्यासाठी गुगल प्रयत्नशील आहे. आतापर्यंत गुगलवर देण्यात आलेल्या भारतातील ऑनलाईन राजकीय जाहिरातींची सविस्तर माहितीचा अहवाल सादर करण्यात येणार आहे. मार्च २०१९ पर्यंत तो उपलब्ध केला जाईल. त्यामुळे नागरिकांना या संदर्भातील सर्व माहिती उपलब्ध होईल. तसेच गरजेनुसार आवश्यक अशी माहिती देखील उपलब्ध होईल.

# राज ठाकरेंवर गुन्हा दाखल करा; हिंदू महासभेची मागणी



**सोलापूर :** भारतमातेचे आक्षेपार्ह व्यंगचित्र काढून देशाचा अपमान केल्याप्रकरणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा अशी मागणी हिंदू महासभेचे शहर उपाध्यक्ष सुधाकर बहिरवाडे यांनी केली आहे. फौजदार चावडी पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दिली आहे.

राज ठाकरे यांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त व्यंगचित्र काढले आहे, यामध्ये त्यांनी भारतमातेचे चित्र रेखाटले असून तिला फाशी दिली आहे. भारतमातेला पंतप्रधान नरेंद्र मोदी व भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा हे दोरीने फाशी देत असल्याचे व्यंगचित्र त्यांच्या टिष्ट्वटर अकाऊंटवर प्रसिद्ध केले आहे.

व्यंगचित्र काढून त्यांनी भारतीयांच्या भावना दुखावल्या आहेत. राज ठाकरे यांनी भारत मातेचा सरळ सरळ अपमान केला असून, संपूर्ण भारतीयांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. त्यांच्या या कृत्यासाठी राज ठाकरे यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे अशी मागणी तक्रारी अर्जातून केली आहे.

# भारतीय हवाई दलाचे जॅग्वार विमान कोसळले; पायलट सुरक्षित



**नवी दिल्लीः** उत्तर प्रदेशमधील कुशीनगर येथे भारतीय हवाई दलाचे जॅग्वार विमान कोसळले. भारतीय हवाई दलाच्या ताफ्यातील हे प्रमुख लढाऊ विमान आहे. विमानातील पायलट सुखरूप असल्याची माहिती आहे. हवाई दलाने या घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. सुपरसॉनिक विमान असलेले जॅग्वार विमानाने गोरखपूर येथील हवाई दलाच्या तळावरून उड्डाण घेतले होते. त्यानंतर १० मिनिटानंतर पायलटचा संपर्क तुटला. कुशीनगरमधील हेतिमपूर गावातील शेतात हे विमान कोसळले. विमान कोसळण्यापूर्वी पायलटने पॅराशूटच्या मदतीने उडी मारल्याने सुखरूप असल्याची माहिती आहे.

# युतीची कोणत्याही क्षणी घोषणा -चंद्रकांत पाटील



**मुंबई -** आगामी निवडणुकांसाठी शिवसेनेबरोबर युती होणारच असल्याचे ठामपणे सांगताना अंतिम घोषणा कोणत्याही क्षणी होऊ शकेल, असा दावा महसूल मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केला. लोकसभा व विधानसभा निवडणुका एकत्र होण्याची शक्यताही त्यांनी फेटाळून लावली.

शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाच्या कामाचा श्रीगणेशा बुधवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झाला. त्यावेळचे एकूण वातावरण पाहता युतीची बोलणी अंतिम टप्प्यात असल्याची चर्चा होती. महसूल मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज मंत्रालयात पत्रकार परिषदेत बोलताना याला अप्रत्यक्ष दुजोरा दिला. शिवसेनेसोबत युती होणार याबाबत आपल्या मनात कोणतीही शंका नाही. त्यामुळे युती होईल हेच मी सांगेन. याची अंतिम घोषणा कोणत्याही क्षणी होऊ शकते, असे सूचक विधान त्यांनी केले. आमचे संबंध भक्कम आहेत. त्यामुळे सौम्य किंवा तीव्र धक्के बसले तरी काहीही फरक पडणार नाही. काही तडे गेले असले तरी ते भरून निघतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. शिवसेना-भाजप युती न झाल्यास पक्ष म्हणून दोघांनाही फरक पडणार नाही; पण युती झाल्यास सामान्य जनतेला हवे असलेले सरकार येईल. जागावाटपाची चर्चा सुरू आहे का, असे विचारले असता, शिवसेना-भाजपमध्ये बैठका वारंवार होतच असतात, असे त्यांनी सांगितले. शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांनी मात्र युतीच्या जगावाटपाची चर्चा सुरू असल्याचा इन्कार केला. आमच्यापुढे कोणताही प्रस्ताव नाही. आमचा काय मॅरेज ब्युरो आहे का? आम्ही प्रस्तावाची वाट बघत बसलेलो नाही, असे त्यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना स्पष्ट केले. लोकसभेसाठी युतीतील जागावाटपाचे पूर्वीचेच सूत्र कायम ठेवण्याबाबत एकमत असले तरी लोकसभेबरोबरच विधानसभेचे जागावाटप जाहीर करण्यासाठी शिवसेना आग्रही असल्याने युतीचा पेच अजून अनिर्णित असल्याचे समजते. भाजपने शिवसेनेला १२५ जागा सोडण्याची तयारी दर्शवली असून शिवसेना अर्ध्या म्हणजेच १४४ जागांसाठी आग्रही असल्याचे समजते.

# देशाच्या लुटारूंना सोडणार नाही -नरेंद्र मोदी



**तामिळनाडू-** देशातील बँकांचे पैसे बुडवून, देशाचा विश्वासघात करून देशाबाहेर पळून जाणाऱ्यांना अजिबात सोडणार नाही असा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला आहे. मदुरैमध्ये एका सभेला ते संबोधित करत होते.


देशाचा पैसा बुडवून पळून जाणाऱ्या आर्थिक गुन्हेगारांवरही मोदींनी सडकून टीका केली आहे. मेहूल चोक्सी, विजय मल्ल्या यांचा स्पष्ट उल्लेख करत मोदी म्हणाले,' देशाचा विश्वासघात करून पळून जाणाऱ्यांना अजिबात सोडणार नाही. देशांचे पैसे लुटणाऱ्यांना आम्ही निश्चित शिक्षा देऊ' . आर्थिक दृष्ट्या मागासांना मिळणाऱ्या आरक्षणाचा विरोध करणाऱ्या डीएमकेवरही त्यांनी टीका केली आहे. ' वैयक्तिक फायद्यासाठी तामिळनाडूतील काही लोकं अविश्वासाचे आणि संभ्रमाचे वातावरण तयार करत आहेत.' केंद्राने दिलेल्या सवर्ण आरक्षणाविरोधात डीएमकेने मद्रास उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. तसंच यावेळी मोदींनी त्यांच्या सरकारने केलेल्या चांगल्या कामांचा पाढाही वाचला. स्वच्छतेच्या क्षेत्रात ग्रामीण भारतात अनेक काम झाली असून देशभर ९ कोटी शौचालयं बांधले असल्याचा उल्लेखही त्यांनी केला आहे. मदुरैत भाषण केल्यानंतर मोदी केरळात सभांना संबोधित करण्यासाठी रवाना झाले आहेत.

# महात्मा फुले जन आरोग्य योजनेत निवृत्त पोलिसांचा समावेश



कर्तव्य बजावत असताना पोलिसांना अनेक समस्या व ताणतणावाला सामोरे जावे लागते. त्यामुळे पोलीस कर्मचाऱ्यांना देखील आरोग्याच्या समस्या भेडसावतात. या पार्श्वभूमीवर राज्यातील पोलीस कर्मचाऱ्यांना आता महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ मिळणार आहे. निवृत्त सहाय्यक पोलीस उपनिरिक्षक, हवालदार, पोलीस नाईक व शिपाई आदींचा योजनेत समावेश करण्यास मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता मिळाली आहे.

# तर राफेल घोटाळा झालाच नसता -अण्णा हजारे



आज लोकपालची नियुक्ती झाली असती तर राफेलचा घोटाळा झालाच नसता. लोकपाल कायद्याची अंमलबजावणी न करता मोदी सरकार लोकशाहीतील दोन्ही सभागृहांचा आणि देशातील संवैधानिक संस्थांचा अवमान करत आहे. या सरकारची वाटचाल हुकूमशाहीच्या दिशेने सुरु आहे, अशी टीका ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी केली. लोकपाल व लोकायुक्ताच्या नियुक्त्या करा या मागणीसाठी अण्णा हजारे हे ३० जानेवारीपासून संत यादवबाबा मंदिरात बेमुदत उपोषण करणार आहेत. या आंदोलनासंदर्भात गुरुवारी राळेगणसिद्धीत देशभरातील कार्यकर्त्यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत अण्णा हजारे यांनी सत्ताधाऱ्यांवर टीका केली. 'राळेगणसिद्धीत उपोषण सुरू केल्यानंतर कार्यकर्त्यांनी आपापल्या ठिकाणी शासकीय कार्यालयांसमोर आंदोलन करावीत. सुरूवातीस चार दिवस निवेदने, मोर्चा, धरणे आदी आंदोलने होतील. त्यानंतर गरज पडली तर उपोषणाचे अस्त्र उगारावे. तसेच प्रत्येक राज्याच्या उच्च न्यायालयात लोकपाल व लोकायुक्ताच्या नियुक्तीसाठी जनहित याचिका दाखल कराव्यात, घटनेने आपणास तो अधिकारच दिला आहे', अशी सूचना त्यांनी केली.

लोकपाल व लोकायुक्ताचा कायदा दोन्ही सभागृहात संमत होऊनही सरकार त्याची अंमलबजावणी करीत नाही. कारण लोकपाल व लोकायुक्त कायदा अमलात आला तर पंतप्रधान, मुख्यमंत्र्यांसह सर्व मंत्रिमंडळ या कायद्याच्या आखत्यारीत येतील याची भीती मोदी सरकारला वाटत आहे. चौकशीचा ससेमिरा मागे लागेल या चिंतेने सरकारला ग्रासले आहे, अशी टीका त्यांनी केली.

# अयोध्या प्रकरणः २९ जानेवारीस न्यायाधीश उपलब्ध नसल्याने सुनावणी पुढे ढकलली



सर्वोच्च न्यायालयात अयोध्याप्रकरणी २९ जानेवारी होणारी सुनावणी पुढे ढकलली आहे. दोन दिवसांपूर्वीच सरन्याधीश रंजन गोगई यांनी अयोध्याप्रकरणी सुनावणी करण्यासाठी ५ सदस्यीय नवीन घटनापीठाचे गठन केले होते. सर्वोच्च न्यायालयाने ॲडिशनल रजिस्ट्रार लिस्टिंगकडून रविवारी प्रसिद्ध करण्यात आलेल्या नोटिशीनुसार घटनापीठातील न्या. एस ए बोबडे हे २९ जानेवारीस उपस्थित राहणार नाहीत. त्यामुळे त्या दिवशी सुनावणी होणार नाही. न्या. यू यू लळित यांनी स्वत:ला या खटल्यापासून वेगळे केल्यानंतर नवीन घटनापीठाची स्थापना केली होती. पूर्वीच सुनावणीची तारीख २९ जानेवारी निश्चित करण्यात आली होती. आता ही तारीखही रद्द करण्यात आली असून आता नवीन तारीख निश्चित केली जाईल. सरन्यायाधीश गोगाई यांनी शुक्रवारी नव्या घटनापीठाचे गठन केले होते. नव्या घटनापीठात न्या. अशोक भूषण, न्या. अब्दूल नजीर यांचा समावेश करण्यात आला होता. घटनापीठात सरन्यायाधीश स्वतः, न्या. एस ए बोबडे आणि न्या. डी वाय चंद्रचूड यांचा समावेश होता. यापूर्वी अयोध्या प्रकरणी गठीत करण्यात अलेल्या जुन्या घटनापीठातील न्या. लळित हे सुनावणीपासून दूर झाले होते. त्यानंतर नवीन घटनापीठाचे गठन करण्यात आले.

पृष्ठ १ वरुन

# 'हेलप्पींग हॅन्ड' या कर्करोग विरोधी काळजी घेणाऱ्या प्रकल्पाच्या अनुषंगाने मिरा-भाईंदरमध्ये आश्रय ट्रस्ट तर्फे शिबिर घेण्यात आले












स्तनातील अनियमित दोष शोधून काढण्यासाठी 'क्ष' किरणांनी किंवा इन्फ्ररिड किरणांनी तपासणी करण्यात आली. अतिशय काळजीपूर्वक महिलांचे विकार किंवा रोग याची लागण हो नये म्हणून आश्रय ट्रस्टच्या वतीने हा उपक्रम राबवण्यात आला. ठिकठिकाणी खेडोपाटी या शिबिराचे आयोजन करु असे आश्वासन आश्रय ट्रस्टच्या संस्थापक व पदाधिकारी यांनी सांगितले. यामध्ये मोठ्या संखेने महिला वर्ग उपस्थित होता.

# भारतातली पहिली कॅडिलॅक कार मराठी माणसाच्या दारी



कॅडिलॅक गाडी प्रथमच भारतामध्ये दाखल झाली आहे. टाटा-बिर्ला-अंबानींच्या घरी नाही, तर भिवंडी येथे राहणाऱ्या एका मराठी माणसाने ही गाडी घेतली आहे. भारतातील ही पहिलीच गाडी आहे. लॅविश आणि लक्झरिअस असलेल्या या कारची किंमत किती आहे माहित आहे? तब्बल पाच कोटी ५० लाख रुपये..

विशेष म्हणजे, जगभरातील महत्वाच्या देशांचे राष्ट्राध्यक्ष आणि उद्यागोपतींची पहिली पसंती परदेशातील रस्त्यांवर दिसणारी कॅडिलॅक कार प्रथमच भारतात अवतरली तीही मराठी माणसाच्या दारी. भिवंडीतमधील दिवा गावी राहणाऱ्या अरूण पाटील यांनी कॅडिलॅक गाडी विकत घेतली आहे. अरूण पाटील भिवंडी महापालिकेच्या शिक्षण मंडळाचे पूर्व सभापती आहेत. कॅडिलॅक ही गाडी सुरक्षेच्या दृष्टीनेही 'लय भारी' आहे. या कारच्या चारही बाजूनं सेन्सर्स आहेत. रस्त्यात खड्डा आला, अपघात होणार असेल, तर कार स्वतःच सावरते. कारचा स्पीड आणि ब्रेक ऑटोमॅटिकली कंट्रोल होतात. कारच्या मागे-पुढे कॅमेरा आहेत. गाडीत क्लायमेट कंट्रोलही होतं. गाडीत वायफायचीही सुविधा आहे. ही गाडी पाहण्यासाठी अरूण पाटील यांच्या घरी बघ्यांच्या गर्दी झाली आहे. परिसरात सध्या हा चर्चेचा विषय ठरला आहे.

# युट्यूबवरील व्हिडीओ पाहून बनावट नोटा बनवणारा अटकेत

**पुणे :** युट्यूबवरील व्हिडीओ पाहून बनावट नोटा बनवणाऱ्या आरोपीला पुणे पोलिसांनी अटक केली आहे. सोहेल सलीम शेख असे आरोपीचे नाव असून तो बनावट नोटा बनवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. पोलिसांनी त्याच्या ऑफीसवर छापा घालून त्याला अटक केली आहे.सोहेल देहूरोड येथे तो बनावट नोटा तयार करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. सोहेलकडे एकाच नंबरच्या २०० रुपयांच्या सात नोटा सापडल्या आहेत. त्याच्याकडे पोलिसांनी चौकशी केली असता त्याने पोलिसांना सांगितले की, युट्यूबवरील व्हिडीओ पाहून तो बनावट नोटा बनवण्यास शिकला.युट्यूबवरचा व्हिडीओ पाहून सोहेलने प्रिंटर विकत घेतला. व्हिडीओमध्ये सांगितल्याप्रमाणे त्याने दोनशे रुपयाच्या नोटा स्कॅन करून त्या पंधरा दिवसापासून बनवत होता. त्या नोटा छोटी - छोटी दुकाने चालवणाऱ्या वृद्ध महिलांना देऊन तो त्यांच्याकडून चॉकलेट, बिस्कीट, सिगारेट, किराणा साहित्य खरेदी करत असल्याचे त्याने पोलिसांना सांगितले. पोलिसांनी सोहेलकडून बनावट नोटा बनवण्यासाठी वापरलेले प्रिंटर, कागद, ब्लेड, कटर हे सगळे साहित्य जप्त केले आहे. सोहेलविरोधात समर्थ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)